**Scholarly Research Journal for Humanity Science & English Language**,
***Online ISSN 2348-3083**, SJ **IMPACT FACTOR 2016 = 4.44, www.srjis.com***
*UGC Approved Sr. No.48612, DEC-JAN 2018, VOL- 5/25*

# भावनिक परिपक्वता (Emotional Maturity) संबंधीच्या संशोधनाचे परिशीलनआणि समीक्षा

***गुणवंतसोनोने*, Ph. D.**

***Abstract***

विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासात भावनिक परिपक्तेचे शैक्षणिक महत्व अनन्यसाधारण आहे. भावनिक परिपक्वता व्यक्तीस विकासाकरिता सदैव प्रेरित करते. भावनिक परिपक्वतेवरील संशोधनाच्या सहायाने भावनिक परिपक्वतेच्या विकासाकरिता प्रयत्न करता येतात. भावनिक परिपक्वते संदर्भात *Shnmugam,T.E.(1956)*, *Dhami, S. (1974)*, *Saovaluk Thongngamkhom* (1983), *Arya. A. (1984)*, *Rawal, V. R. (1984)*, *Pattramon Jummpengpm* (1986), *Sabapathi, T. (1986)*, *Sunita* (1986), *Bhagabati (1987)*, *Manral Bheema (1988)*, *Kashyap Veena (1989)*, *Sodhi Raman (1989)*, *Arora, R.K. (1992)*, धारस्कर, आशा मधुकरराव *(2002)*, तुरणकर, हेमलता नरेश *(2007)*, सोनोने, गुणवंत *(2008)* यांच्या द्वारे केलेले संशोधन भावनिक परिपक्वतेच्या विकासाकरिता दीपस्तंभा समान मार्गदर्शक ठरते. भावनिक परिपक्वतेचा सामाजिक-आर्थिक स्तर, बुद्धिमत्ता, शैक्षणिक संपादन, मूल्य, समायोजन, शालेय वातावरण, चिंता, सामाजिक परिपक्वता, लिंग, निराशा, सुरक्षितता व असुरक्षितता, संपादन प्रेरणा, सृजनशीलता, ग्रामीण व शहरी क्षेत्र, अनु.जाती व अनु.जमातीतील विद्यार्थी इत्यादी घटकासंबंधित संशोधन करण्यात आले वरील चलांचा परस्पर संबंध असल्याचे दिसून आले. भावनिक परिपक्वता व विविध चलांचा परस्पर संबंध लक्षात घेवून विद्यार्थ्याकरिता शालेय, कौटुंबिक व सामाजिक वातावरणाची निर्मिती करावयास हवी. वरील पूर्व संशोधनाच्या परिशीलन व समीक्षेवरून महत्वपूर्ण तथ्ये समोर आलीत. ज्याचा लाभ शैक्षणिक उन्नतीकरिता शिक्षा क्षेत्रात कार्यरत व्यक्तींना करता येईल.

***Scholarly Research Journal's is licensed Based on a work at www.srjis.com***

## प्रस्तावना :

संशोधनाकरिता निवड केलेल्या समस्येचे आकलन होण्यासाठी संबंधित साहित्याचा आढावा घेणे महत्वाचे आहे. संशोधनाला दिशा प्राप्त होते. सखोल ज्ञान मिळविणे, विषयाचे विविध पैलू समजून घेणे, संशोधन विषयाची योग्य, व्यवस्थित व आधारभूत माहिती मिळविणे, विषयावर प्रभुत्व प्राप्त करणे इ. करिता पूर्व संशोधनाचा आढावा घेणे आवश्यक आहे. " संशोधन विषयाच्या संबंधात जे महत्वपूर्ण ज्ञान उपलब्ध आहे त्याचा सारांश देणे व त्या विषयात उपलब्ध असलेल्या ज्ञानाचा आधार घेवून ज्ञानाचा शोध घेण्यासाठी अथवा उपलब्ध ज्ञानाचा नवीन परिस्थितीमधील बदललेला अर्थ विषद करण्यासाठी संबंधित संशोधन विषयाचा पाया

*Copyright © 2017, Scholarly Research Journal for Interdisciplinary Studies*

भक्कम करणे म्हणजे संबंधीत संशोधनाचे परिशीलन होय." म्हणूनच म्हणतात कि, "Practically all human knowledge can be found in books and libraries unlike other animals that must start a new with each generation, man builds upon the accumulated and recorded knowledge of the past. His constant adding to the vast store of knowledge makes possible progress in all areas of human endeavor." डॉ.एकनाथराव गावंडे आणि वर्षा झोंबाडे यांच्या शब्दात सांगायचे झाल्यास,

***"इतिहासाचा परामर्श घेतल्याशिवाय***
***वर्तमानाचे कर्तव्य पूर्ण होत नाही.***
***नाहीतर भविष्याचे केलेले नियोजन***
***कोलमडून पडल्याशिवाय राहत नाही"***

**भावनिक परिपक्वता (Emotional Maturity) संबंधीच्या संशोधनाचे परिशीलन -**

भावनिक परिपक्वता यावर आजपर्यंत झालेल्या संशोधनाचे परिशीलन पुढीलप्रमाणे करता येईल.

1) ***Shanmugam,T.E.(1956)*** यांनी"*Adolescent personality-an investigation of the emotional instability of adolescent boys of low socio-economic families."* या विषयांवर संशोधन केले यामध्ये निम्न सामाजिक-आर्थिक स्तरातील किशोरवयीन विद्यार्थ्यांच्या भावनिक अस्थैर्याच्या लक्षणाचा आणि भावनिक अस्थैर्याच्या कारणांचा शोध घेण्याचा प्रयत्न करण्यात आला. या संशोधनाद्वारे खालील निष्कर्ष मांडण्यात आले. 1) १५ वर्षे वयोगटातील किशोरवयीनांमध्ये भावनिक अस्थैर्याचे बरेच लक्षण आढळून आले. अतिसंवेदना, चिंता, पुर्वाभिमुखता, मानसिक क्षीनतेची प्रवृत्ती इ. महत्वपूर्ण लक्षणे आढळून आले. इतर घटकाच्या तुलनेत अति संवेदनाचे प्रमाण जास्त आढळले 2) मानसिक क्षीनतेची वृत्ती व निद्रेतील फरक यामध्ये तरुणावस्थेतील वयोगटात महत्वपूर्ण प्रमाण आढळून आले. 3) सुप्त व असुप्तवास्थेतील भावनिक अस्थैर्याची कारणे सारखी आढळून आली.

**2) *Dhami, S. (1974)*** यांनी "*Intelligence, emotional maturity and socio-economic status as factor indicative of success in scholastic achievement."* या विषयांवर संशोधन केले यामध्ये बुद्धिमत्ता आणि भावनिक परिपक्वतेचे शैक्षणिक संपादनाच्या यशाकरिता योगदान आणि बुद्धिमत्ता व भावनिक परिपक्वता यामध्ये जवळचा संबंध शोधण्याचा प्रयत्न करण्यात आला. या संशोधनाद्वारे खालील निष्कर्ष मांडण्यात आले. बुद्धिमत्ता आणि भावनिक परिपक्वता यांचे शैक्षणिक संपादनातील यशाकरिता असलेले योगदान

फार मोठ्या प्रमाणात होते. बुद्धिमत्ता आणि भावनिक परिपक्वता यामध्ये सार्थक असा संबंध आढळला. शैक्षणिक संपादन आणि भावनिक परिपक्वता यामधील सहसंबंध आणि सामाजिक-आर्थिक दर्जा आणि शैक्षणिक संपादन यामधील सहसंबंध सार्थकपणे वेगळे होते सामाजिक-आर्थिक दर्जाचा सकारात्मक परिणाम भावनिक परिपक्वतेवर आढळला. विशेषतः पालकांचे शिक्षण, कुटुंबाचे उत्पन्न, सांस्कृतिक पातळी, घराचा प्रकार, ठिकाण आणि अध्यापन कर्त्याचा व्यवसाय महत्वाकांक्षा या बाबतीत दहावीच्या मुलांपेक्षा नववीच्या मुलांमध्ये शैक्षणिक संपादन आणि भावनिक स्थिरता यामधील सहसंबंध जास्त आढळला कारण दहावीची मुलं येणाऱ्या बोर्डाच्या परीक्षेमुळे जास्त चिंताग्रस्त होते.

**3) *Saovaluk, Thongamkhom (1983)*** *यांनी "A study of social maturity as a function of some psycho-socio-Adjustment factors of B.Ed. College students of North-central Region of Thailand."* या विषयावर संशोधन केले. यामध्ये उत्तर-मध्य थायलंड मधील शिक्षण महाविद्यालयातील विद्यार्थ्यांच्या सामाजिक परिपक्वतेचा अभ्यास करण्यात आला. संशोधनाद्वारे असे दिसून आले कि उच्च नेतृत्व गुण असणारे विद्यार्थी हे निम्न नेतृत्व गुण असणाऱ्या विद्यार्थ्यांपेक्षा जास्त सामाजिक परिपक्व असतात.

**4) *Arya. A. (1984)*** यांनी *"Emotional maturity and value of superior children in family."* या विषयांवर संशोधन केले. यामध्ये बुद्धिमत्ता व भावनिक परिपक्वतेच्या परस्पर संबंधाचा मुलं आणि मुलींच्या संदर्भात आणि मुलांचे लिंग, वय, निवास इ. घटकांचा भावनिक परिपक्वतेवर होणाऱ्या परिणामांचा अभ्यास करण्यात आला. या संशोधनाद्वारे खालील निष्कर्ष मांडण्यात आले. उच्च दर्जाच्या मुलं आणि मुलींनीभावनिक परिपक्वता चाचणीला चांगला प्रतिसाद दर्शविला. त्याचप्रमाणे उच्च दर्जाच्या बुद्धिमत्तेचा भावनिक परिपक्वतेशी उच्च दर्जाचा संबंध असतो वयानुसार आयुष्याचे १३,१४,१५,१६ असे चार स्तर आहे. त्यांच्या भावनिक परिपक्वतेमध्ये फारसा फरक नसते.

**5) *Rawal, V. R. (1984)*** यांनी *"Personality adjustment and attitude towards authority of emotionally disturbed adolescents in relation to their home and school environment."* या विषयांवर संशोधन केले यामध्ये भावनिकदृष्ट्या अस्थिर विद्यार्थ्यांचे व्यक्तिमत्व समायोजन आणि अधिकारप्रवृत्ती यांचा कुटुंब व शालेय वातावरण यांच्यातील संबंधाचा अभ्यास करण्यात आला. या संशोधनाद्वारे खालील निष्कर्ष मांडण्यात आले. भावनिक अस्वस्थ विद्यार्थ्यांच्या समायोजन स्तरात महत्वपूर्ण फरक आढळून आला

नाही. भावनिक अस्वस्थ विद्यार्थ्यांच्या अधिकार वृत्तीत महत्वपूर्ण फरक आढळून आला नाही. भावनिकदृष्ट्या विचलित विद्यार्थ्यांचे वयोगट व व्यक्तिमत्व समायोजन आणि पालक व शिक्षकांच्या अधिकार प्रवृत्तीत महत्वपूर्ण फरक आढळून आला नाही. भावनिकदृष्ट्या अस्थिर विद्यार्थ्यांची अधिकार वृत्ती आणि समायोजन यात सकारात्मक फरक आढळून आला नाही. भावनिकदृष्ट्या अस्थिर विद्यार्थ्यांच्या पालकांचा शैक्षणिक दर्जा आणि समायोजन आणि अधिकार वृत्तीत महत्वपूर्ण फरक आढळून आला नाही. भावनिकदृष्ट्या अस्थिर विद्यार्थ्यांच्या संपूर्ण समायोजनावर शालेय वातावरणाचा प्रभाव पडतांना आढळतो

**6) *Sunita (1986)*** *यांनी "Motor ability as a factor in home, social and emotional adjustment in adolescents ($13^+$ to $16^+$)."* या विषयावर संशोधन केले. यामध्ये किशोरावस्थेतील कारक क्षमता आणि भावनिक समायोजन, सामाजिक समायोजन, कौटुंबिक समायोजन यातील संबंधाचा शोध घेण्यात आला. असे आढळून आले कि मुलींच्यातुलनेत मुलांचीभावनिक व समायोजन क्षमता अधिक असते.

**7) *Sabapathi, T. (1986)*** यांनी *"A study of the Relationship of manifest anxiety, emotional maturity and social maturity of standard x students to their Academic Achievement."* या विषयांवर संशोधन केले. यामध्ये इयत्ता दहावीतील विद्यार्थी आणि इतर विद्यार्थी यांच्या स्वतंत्र चलातील सतत चिंता, भावनिक परिपक्वता, सामाजिक परिपक्वता, सामाजिक-आर्थिक स्तर आणि विद्यार्थ्यांचे लिंग, सूचनेचे माध्यम आणि शैक्षणिक संपादनाचा शोध घेण्यात आला. या संशोधनाद्वारे खालील निष्कर्ष मांडण्यात आले भावनिक परिपक्वतेचा गणित, सामान्य विज्ञान, सामाजिक शास्त्र व संपूर्ण शैक्षणिक संपादनावर सकारात्मक प्रभाव दिसून येतो. भावनिक परिपक्वता, सामाजिक-आर्थिक परिपक्वता, सामाजिक परिपक्वता स्तरांचा पूर्ण परिणाम शैक्षणिक संपादनावर दिसून आला.

**8) Pattramon, Jumpangern (1986)** यांनी "A study of social maturity of teachers- college students of Western region of Thailand in context of some psycho-socio factors." या विषयावर संशोधन केले. यामध्ये पश्चिम थायलंडमध्ये येणाऱ्या ग्रामीण आणि शहरी भागातील महाविद्यालयीन शिक्षक आणि विद्यार्थ्यांच्या सामाजिक परिपक्वतेचा अभ्यास करण्यात आला. संशोधनावरून असे दिसून आले कि शहरी भागातून आलेला महाविद्यालयीन शिक्षक-विद्यार्थी ग्रामीण भागातून आलेल्या शिक्षक-विद्यार्थ्यापेक्षा जास्त परिपक्व असतो.

*Copyright © 2017, Scholarly Research Journal for Interdisciplinary Studies*

**9) *Bhagabati (1987)*** यांनी *"Co-curricular Activities organized in the secondary schools of Assam and its relevance on physical, social, emotional Aspects of Adolescent Girls and Boys."* या विषयांवर संशोधन केले यामध्ये किशोरावस्थेतील विद्यार्थ्यांच्या शारीरिक, भावनिक, सामाजिक दृष्टीने समायोजनावर अभ्यासपुरक कार्यक्रमाचा पडणाऱ्या प्रभावांचा शोध घेण्यात आला. या संशोधनाद्वारे खालील निष्कर्ष मांडण्यात आले. या संशोधनाद्वारे खालील निष्कर्ष मांडण्यात आले किशोरावस्थेतील शारीरिक, भावनिक, मानसिक, सामाजिक समायोजनात अभ्यासपुरक उपक्रमांची भूमिका महत्वपूर्ण दिसून आली. जे विद्यार्थी सामाजिक व अभ्यासपुरक उपक्रमात सहभागी होतात ते विद्यार्थी सामाजिक व अभ्यासपुरक उपक्रमात सहभागी न होणाऱ्या विद्यार्थांच्या तुलनेत समायोजन साधतात.

**10) *Manral, Bheema (1988)*** यांनी *"The impact of emotional maturity prolonged deprivation on indiscipline behavior among university students in relation to their academic achievement."* या विषयांवर संशोधन केले. यामध्ये बेशिस्त वर्तन प्रवृत्तीशी, भावनात्मक परिपक्वता आणि शैक्षणिक संपादन यांचा कसा संबंध आहे याचा अभ्यास करणे, तीन गटातील विद्यार्थ्यामध्ये भावनिक परिपक्वता व संपादन यादृष्टीने निवडलेले दोन गट बेशिस्त वर्तनाशी सार्थकपणे कसे भिन्न आहेत याचा अभ्यास करणे, विद्यार्थ्यांचे लिंग, सातत्यपूर्ण निराशा, भावनिक परिपक्वता व संपादन यादृष्टीने निवडलेले दोन गट बेशिस्त वर्तनाशी सार्थकपणे कसे भिन्न आहेत याचा अभ्यास करणे, ही उद्दिष्ट निश्चित करण्यात आली. या संशोधनाद्वारे खालील निष्कर्ष मांडण्यात आले भावनिक परिपक्वतेचा (EM) बेशिस्त वर्तनाशी (IB) संबंध होता. EM च्या पाच दिशेपैकी भावनात्मक अस्थिरता ही वर्ग खोलीतील वर्तनाशी विद्यार्थी संघटना क्रिया व किरकोळ स्थितीतील वर्तन यांच्याशी संबंधित होता Emotional Regression हे विद्यार्थी संघटना क्रियेशी संबंधित होते. बेशिस्त वर्तन हे सातत्यपूर्ण निराशेसी (PD) संबंधित होते. भावनात्मक अस्थिरता ही परिवार पर्यावरण, आर्थिक संपन्नता, शिकविण्याचा अनुभव, पालकांची वैशिष्ट्ये, पालकांची प्रतिक्रिया, प्रवर्तनात्मक अनुभव, भावनात्मक अनुभव व सातत्यपूर्ण निराशेचे संपूर्ण गुण यांच्याशी संबंधित होती भावनिक परिपक्वता आणि सातत्यपूर्ण निराशा जेंव्हा संपादनापासून वेगळे करण्यात आले तेंव्हा त्याचा बेशिस्त वर्तनावर प्रभाव दिसून आला. उच्च परिपक्वता गट हा सातत्यपूर्ण निराशेपेक्षा सार्थपणे वेगळा होता. संपादन, वस्तीगृहातील वर्तन, सांस्कृतिक व क्रीडा कार्यक्रमाशी वर्तन आणि बेशिस्त वर्तन यांची तुलना केली असता ते सार्थकपणे भिन्न होते

*Copyright © 2017, Scholarly Research Journal for Interdisciplinary Studies*

उच्च नैराश्य गट विद्यार्थी हे निम्न नैराश्य गटाच्या मानाने भावनिक परिपक्वतेबाबत भिन्न होते. भावनिक परिपक्वता आणि बेशिस्त वर्तनाच्या बाबतीत उच्च संपादन विद्यार्थ्याच्या मानाने निम्न संपादन विद्यार्थ्यापेक्षा वेगळे होते. उच्च बेशिस्त वर्तन विद्यार्थ्याच्या मानाने निम्न बेशिस्त वर्तन विद्यार्थ्यापेक्षा सातत्यपूर्ण निराशा, भावनिक परिपक्वता आणि संपादन बाबतीत सार्थकपणे वेगळे होते.

**11) *Kashyap, Veena (1989)*** यांनी *"A psychological determinant of adolescent's problems."* या विषयांवर संशोधन केले यामध्ये ग्रामीण व शहरी भागातील इयत्ता ११ वी व १२ वीत अध्ययन करणाऱ्या किशोरवयीन मुले व मुली यांची अध्ययन निष्पत्ती आणि चिंता, वैफल्य, सुरक्षितता व असुरक्षितता, भावनिक परिपक्वता, बुद्धिमत्ता याचा स्तर व समस्या ओळखण्याचा प्रयत्न करण्यात आला. या संशोधनाद्वारे खालील निष्कर्ष मांडण्यात आले. किशोरवयीन समस्येचा चिंता, वैफल्य असुरक्षिततेची भावना आणि भावनिक परिपक्वतेत उच्च व धनात्मक सहसंबंध आढळून आला. किशोरवयीन समस्येचा सुरक्षिततेची भावना आणि भावनिक सुरक्षितता यांच्यात उच्च व ऋनात्मक सहसंबंधआढळून आला.

**12*) Sodhi, Raman (1989)*** *यांनी "A comparative study of emotional problems in minority group and caste Hindu's children and their level achievement motivation and scholastic achievement."* या विषयांवर संशोधन केले. यामध्ये बहुसंख्य व अल्पसंख्य मुलांच्या गटातील भावनात्मक अडथळयाचा दर अभ्यासून दोन गटातील भावनात्मक अडथळयांची रचना व कारणे यांचा तुलनात्मक अभ्यास करणे, भावनात्मक अडथळयांचा त्यांच्या शालेय संपादनावर वN-Ach (Need for Achievement) वर होणारा परिणाम अभ्यासणे, या मुलांतील भावनात्मक अडथळे शालेय संपादन व संपादन आवश्यकता यातील संबंधाचा अभ्यास करणे, ही उद्दिष्ट्ये निश्चित करण्यात आली. या संशोधनाद्वारे खालील निष्कर्ष मांडण्यात आले. अल्पसंख्य व बहुसंख्य गटातील विद्यार्थी हे प्रचलित भावनात्मक अडथळे दर यात सार्थक असा फरक असलेले नव्हते तर त्यांच्यातील सार्थक फरक हा भावनात्मक रचनेतील फरकामध्ये होता. भावनात्मक अडथळे असलेल्या मुलांमध्ये संपादनाची आवश्यकता व सामाजिकआर्थिक दर्जा तुलनात्मकदृष्ट्या सर्वसामान्य मुलांपेक्षा कोणताही सार्थक फरक आढळून आला नाही. भावनात्मक अडथळे हे संपादनाशी नकारात्मक दृष्टीने व सार्थकपणे संबंधित होते.

**13) *Arora, R.K. (1992)*** *यांनी “International effect of creativity and intelligence on emotional stability, personality adjustment and academic achievement.”* या विषयांवर संशोधन केले. यामध्ये सृजनशीलता व बुद्धिमत्ता यांचा भावनात्मक स्थैर्य, व्यक्तिमत्व समायोजन व शैक्षणिक संपादन यांच्यावर होणाऱ्या प्रतिक्रियात्मक परिणामाचा शोध घेण्यात आला. या संशोधनाद्वारे खालील निष्कर्ष मांडण्यात आले. उच्च सर्जनशीलता / उच्च बुद्धिमत्ता असणारा गट हा इतर तीन सर्जनशील / बुद्धिमत्ता गटापेक्षा सार्थकदृष्ट्या उच्च भावनिक स्थैर्याशी संबंधित होता

**14) *धारस्कर, आशा मधुकरराव (2002)*** यांनी *“विदर्भातील स्त्रियांचा काही मुलभूत व्यक्तिमत्व स्वभाव वैशिष्ट्यावर आणि भावनिक परिपक्वतेवर शिक्षणाचा होणारा परिणाम........ एक अभ्यास.”* या विषयांवर संशोधन केले. यामध्ये सुशिक्षित व अशिक्षित स्त्रियांच्या भावनिक परिपक्वतेवर होणारा परिणाम अभ्यासण्यात आला. या संशोधनाद्वारे खालील निष्कर्ष मांडण्यात आले सुशिक्षित स्त्रिया ह्या अशिक्षित स्त्रियांच्या मानाने भावनात्मकदृष्ट्या अधिक परिपक्व आहेत. शहरी व ग्रामीण स्त्रियांच्या भावनिक परिपक्वतेमध्ये विशेष फरक नाही. ग्रामीण भागातील अशिक्षित स्त्रियापेक्षा सुशिक्षित स्त्रिया जास्त भावनिक परिपक्व आहेत. शहरी भागातील सुशिक्षित स्त्रिया शहरी भागातील अशिक्षित स्त्रियापेक्षा जास्त भावनिक परिपक्व असतात. अशिक्षित शहरी स्त्रियापेक्षा अशिक्षित ग्रामीण स्त्रिया जास्त भावनिक परिपक्व असते. शहरात व ग्रामीण भागात राहणाऱ्या सुशिक्षित स्त्रिया ह्या सारख्याच भावनिक परिपक्व असतात. भावनिक परिपक्वतेचे पाचही घटक शहरी व ग्रामीण सुशिक्षित स्त्रियात शहरी व ग्रामीण अशिक्षित स्त्रियांपेक्षा जास्त प्रमाणात आढळतात.

**15) *तुरणकर, हेमलता नरेश (2007)*** यांनी *“बुद्धिमत्ता, भावनिक परिपक्वता आणि सामाजिक, आर्थिक दर्जा हे शैक्षणिक संपादनाचे यशदर्शक घटक - एक अध्ययन.”* या विषयांवर संशोधन केले यामध्ये माध्यमिक शाळेतील वर्ग ९ मधील विद्यार्थ्यामध्ये असणाऱ्या भावनिक परिपक्वतेचे मापन करणे, माध्यमिक शाळेतील वर्ग ९ मधील विद्यार्थ्यामध्ये असणाऱ्या बुद्धिमत्ता व भावनिक परिपक्वता यामधील सहसंबंध शोधणे माध्यमिक शाळेतील वर्ग ९ मधील विद्यारर्थ्यांचा सामाजिक-आर्थिक दर्जा आणि भावनिक परिपक्वता यामधील सहसंबंध शोधणे, माध्यमिक शाळेतील वर्ग ९ मधील विद्यार्थ्यामध्ये असणाऱ्या बुद्धिमत्ता व भावनिक परिपक्वता, सामाजिक-आर्थिक दर्जा हे शैक्षणिक संपादनाचे यशदर्शक घटक कसे आहेत ? हे सहसंबंधातून शोधणे ही उद्दिष्ट्ये निश्चित करण्यात आली. या संशोधनाद्वारे खालील निष्कर्ष मांडण्यात आले. विद्यार्थ्यामध्ये भावनिकदृष्ट्या स्थिर

*Copyright © 2017, Scholarly Research Journal for Interdisciplinary Studies*

विद्यार्थ्यापेक्षा भावनिकदृष्ट्या अस्थिर विद्यार्थ्यांचे प्रमाण जास्त आढळले. ग्रामीण विद्यार्थ्यापेक्षा शहरी विद्यार्थी हे जास्त प्रमाणात भावनिकदृष्ट्या स्थिर असतात तर शहरी विद्यार्थ्यापेक्षा जास्त प्रमाणात ग्रामीण विद्यार्थी अस्थिर आढळले. भावनिक स्थिरतेबाबत मुलांपेक्षा मुलींचे प्रमाण जास्त आहे तर भावनिक अस्थिरतेबाबत मुलींपेक्षा मुलांचे प्रमाण जास्त आढळले.

**16) *सोनोने, गुणवंत* (2008)** यांनी "*यवतमाळ जिल्ह्यातील इयत्ता आठवीमध्ये अध्ययन करणाऱ्या अनुसूचित जाती व अनुसूचित जमातीच्या विद्यार्थ्यांच्या भावनिक परिपक्वतेचा तुलनात्मक अभ्यास.*" या विषयांवर संशोधन केले. प्रस्तुत संशोधनासाठी खालील उद्दिष्ट्ये निर्धारित करण्यात आली. इयत्ता आठवीमध्ये अध्ययन करणाऱ्या अनु. जाती व अनु. जमातीच्या विद्यार्थ्यांच्या भावनिक परिपक्वतेचा शोध घेणे, इयत्ता आठवीमध्ये अध्ययन करणाऱ्या अनु. जातीतील ग्रामीण भागातील विद्यार्थी व विद्यार्थिनीच्या भावनिक परिपक्वतेचे तुलनात्मक मापन करणे, इयत्ता आठवीमध्ये अध्ययन करणाऱ्या अनु. जातीतील शहरी भागातील विद्यार्थी व विद्यार्थिनीच्या भावनिक परिपक्वतेचे तुलनात्मक मापन करणे, इयत्ता आठवीमध्ये अध्ययन करणाऱ्या अनु. जमातीतील ग्रामीण भागातील विद्यार्थी व विद्यार्थिनीच्या भावनिक परिपक्वतेचे तुलनात्मक मापन करणे, इयत्ता आठवीमध्ये अध्ययन करणाऱ्या अनु. जमातीतील शहरी भागातील विद्यार्थी व विद्यार्थिनीच्या भावनिक परिपक्वतेचे तुलनात्मक मापन करणे, इयत्ता आठवीमध्ये अध्ययन करणाऱ्या अनु. जाती व अनु. जमातीतील ग्रामीण भागातील विद्यार्थी व विद्यार्थिनीच्या भावनिक परिपक्वतेचे तुलनात्मक मापन करणे, इयत्ता आठवीमध्ये अध्ययन करणाऱ्या अनु. जाती व अनु. जमातीतील शहरी भागातील विद्यार्थी व विद्यार्थिनीच्या भावनिक परिपक्वतेचे तुलनात्मक मापन करणे, इयत्ता आठवीमध्ये अध्ययन करणाऱ्या अनु. जाती व अनु. जमातीतील ग्रामीण व शहरी भागातील विद्यार्थी व विद्यार्थिनीच्या भावनिक परिपक्वतेचे तुलनात्मक मापन करणे. या संशोधनाद्वारे खालील निष्कर्ष मांडण्यात आले अनु. जाती व अनु. जमातीतील विद्यार्थ्यांमध्ये भावनिक अस्थिरता, भावनिक दमन, सामाजिक कुसमायोजन, व्यक्तिमत्व विघटन या घटकाबाबत समानता आहे तर अनु. जातीतील विद्यार्थ्यांपेक्षा अनु. जमातीतील विद्यार्थ्यांत नेतृत्वहिनता अधिक प्रमाणात आढळली. अनु. जाती व अनु. जमातीतील विद्यार्थ्यांत भावनिक परिपक्वता समान आढळली. ग्रामीण व शहरी भागातील विद्यार्थ्यांत भावनिक अस्थिरता व नेतृत्वहिनता समान असून भावनिक दमन, सामाजिक कुसमायोजन, व्यक्तिमत्व विघटन यात सार्थक फरक आढळला. ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांपेक्षा शहरी भागातील विद्यार्थ्यांत भावनिक दमन,

सामाजिक कुसमायोजन, व्यक्तिमत्व विघटन अधिक प्रमाणात असल्याचे दिसून आले. ग्रामीण भागातील विद्यार्थ्यापेक्षा शहरी भागातील विद्यार्थ्याची भावनिक परिपक्वता अधिक आढळून आली. ग्रामीण भागातील अनु. जाती व अनु. जमातीतील विद्यार्थ्याचे भावनिक दमन, सामाजिक कुसमायोजन, व्यक्तिमत्व विघटन, नेतृत्वहिनता यात समानता आहे व भावनिक अस्थिरता यात सार्थक फरक आहे. ग्रामीण भागातील अनु. जमातीपेक्षा अनु. जातीची भावनिक अस्थीरता अधिक आढळून आली. ग्रामीण भागातील अनु. जाती व अनु. जमातीतील विद्यार्थ्याच्या भावनिक परिपक्वतेत सार्थक फरक नाही. शहरी भागातील अनु. जाती व अनु. जमातीच्या विद्यार्थ्याचे भावनिक दमन या घटकात समानता आहे. तर भावनिक अस्थिरता, सामाजिक कुसमायोजन, व्यक्तिमत्व विघटन, नेतृत्वहिनता यात सार्थक फरक आढळला. शहरी भागातील अनु. जातीतील विद्यार्थ्यापेक्षा अनु. जमातीतील विद्यार्थ्यात भावनिक अस्थिरता, सामाजिक, कुसमायोजन, व्यक्तिमत्व विघटन, नेतृत्वहिनता अधिक प्रमाणात आढळून आली. शहरी भागातील अनु. जाती व अनु. जमातीतील विद्यार्थ्याच्या भावनिक परिपक्वतेत सार्थक फरक आढळून आला. शहरी भागातील अनु. जातीतील विद्यार्थ्यापेक्षा अनु. जमातीतील विद्यार्थ्याची भावनिक परिपक्वता अधिक आढळून आली. अनु. जाती व अनु. जमातीतील विद्यार्थी व विद्यार्थीनींची भावनिक अस्थिरता, भावनिक दमन, सामाजिक कुसमायोजन, व्यक्तिमत्व विघटन, नेतृत्वहिनता यात समानता आढळून आली. अनु. जाती व अनु. जमातीतील मुलं (विद्यार्थी) व मुली (विद्यार्थीनी) च्या भावनिक परिपक्वतेत सार्थक फरक आढळून आला नाही.

**भावनिक परिपक्वतेसंबंधी झालेल्या संशोधनाची समीक्षा -**

1. अनु. जाती व अनु. जमातीतील विद्यार्थ्यांमध्ये भावनिक अस्थिरता, भावनिक दमन, सामाजिक कुसमायोजन, व्यक्तिमत्व विघटन या घटकाबाबत समानता आहे तर अनु. जातीतील विद्यार्थ्यांपेक्षा अनु. जमातीतील विद्यार्थ्यांत नेतृत्वहिनता अधिक प्रमाणात आहे असा निष्कर्ष निघतो.

नेतृत्व हिनतेबाबतचा निष्कर्ष हा **Saovaluk Thongngamkhom** (1983) यांच्या "उच्च नेतृत्व गुण असणारे विद्यार्थी हे निम्न नेतृत्व गुण असणाऱ्या विद्यार्थ्यांपेक्षा जास्त सामाजिक परिपक्व आढळले'' या निष्कर्षाशी मिळताजुळता आहे. भावनिक अस्थिरतेबाबतचा निष्कर्ष हा **Rawal U.R.** (1984) यांच्या "भावनिक अस्वस्थ विद्यार्थ्यांच्या समायोजन स्तरात महत्वपूर्ण फरक आढळून आला नाही'' या निष्कर्षाशी सुद्धा मिळताजुळता आहे. नेतृत्व हिनतेबाबतचा निष्कर्ष हा **Pattramon Jummpengpm** (1986) यांच्या "उच्च

नेतृत्व गुण असणारे विद्यार्थी हे निम्न नेतृत्व गुण असणाऱ्या विद्यार्थ्यांपेक्षा जास्त परिपक्व आहे या निष्कर्षाशी मिळताजुळता आहे.

2. ग्रामीण व शहरी भागातील विद्यार्थ्यांत भावनिक अस्थिरता व नेतृत्वहिनता समान असून भावनिक दमन, सामाजिक कुसमायोजन, व्यक्तिमत्व विघटन यात सार्थक फरक आढळला. ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांपेक्षा शहरी भागातील विद्यार्थ्यांत भावनिक दमन, सामाजिक कुसमायोजन, व्यक्तिमत्व विघटन अधिक प्रमाणात आहे असा निष्कर्ष निघतो. परिपक्वतेबाबत **Pattramon Jmmpangprn** (1986) यांच्या "शहरी भागातून आलेला महाविद्यालयीन शिक्षक-विद्यार्थी ग्रामीण भागातून आलेल्या शिक्षक-विद्यार्थ्यापेक्षा जास्त परिपक्व असतो'' या निष्कर्षाशी पूर्णपणे विसंगत आहे.

3. ग्रामीण भागातील अनु. जाती व अनु. जमातीतील विद्यार्थ्याच्या भावनिक परिपक्वतेत सार्थक फरक नाही. शहरी व ग्रामीण भागाबाबत **आशा धारस्कर** (2002) यांच्या "शहरी व ग्रामीण भागातील स्त्रियांच्या भावनिक परिपक्वतेत विशेष फरक नाही'' या निष्कर्षाशी बराच मिळताजुळता आहे.

4. शहरी भागातील अनु. जाती व अनु. जमातीतील विद्यार्थ्याच्या भावनिक परिपक्वतेत सार्थक फरक आढळून आला. शहरी भागातील अनु. जातीतील विद्यार्थ्यापेक्षा अनु. जमातीतील विद्यार्थ्याची भावनिक परिपक्वता अधिक आहे. ग्रामीण व शहरी भागाबाबत **हेमलता तुरणकर** (2007) यांच्या "ग्रामीण विद्यार्थ्यापेक्षा शहरी विद्यार्थी हे अधिक प्रमाणात भावनिकदृष्टया स्थीर असतात. तर शहरी विद्यार्थ्यापेक्षा ग्रामीण विद्यार्थी अधिक प्रमाणात भावनिकदृष्टया अस्थिर असतात'' या निष्कर्षाशी पूर्णपणे विसंगत आहे

5. अनु. जाती व अनु. जमातीतील मुलं (विद्यार्थी) व मुली (विद्यार्थीनी) च्या भावनिक परिपक्वतेत सार्थक फरक आढळून आला नाही. विद्यार्थी व विद्यार्थीनी बाबत **Sunita** (1986) यांच्या "मुलींच्या तुलनेत मुलांची भावनिक व समायोजन क्षमता अधिक आढळून आली'' यांच्या निष्कर्षाशी पूर्णपणे विसंगत आहे.

प्रस्तुत संशोधनाला काही मर्यादा पडलेल्या आहेत याची जाणिव संशोधकाला असते. प्रस्तुत संशोधन हे मर्यादित कालावधीत करावयाचे असल्यामुळे तथ्य संकलनाकरिता निवडलेला न्यादर्शही मर्यादित स्वरुपाचा असतो. संशोधनाच्या मर्यादा लक्षात घेवून पुढील विषयावर संशोधन करता येईल. पूर्व प्राथमिक, प्राथमिक, कनिष्ठ महाविद्यालय, वरिष्ठ महाविद्यालयीन स्तरावर तसेच राज्य व राष्ट्रीय स्तरावर संशोधन करता येईल. भावनिक परिपक्वतेचा शैक्षणिक निष्पत्तीवर होणारा परिणाम, भावनिक बुद्धिमत्ता व भावनिक परिपक्वता याचा

*Copyright © 2017, Scholarly Research Journal for Interdisciplinary Studies*

तुलनात्मक अभ्यास, सामाजिक परिपक्वता व भावनिक परिपक्वता यांचा सहसंबंधात्मक अभ्यास, भावनिक परिपक्वता व समायोजन यांचा सहसंबंधात्मक अभ्यास यावर संशोधन करता येईल.

## समारोप:

Shnmugam,T.E.(1956), Dhami, S. (1974), Saovaluk Thongngamkhom (1983), Arya. A. (1984), Rawal, V. R. (1984), Pattramon Jummpengpm (1986), Sabapathi, T. (1986), Sunita (1986), Bhagabati (1987), Manral Bheema (1988), Kashyap Veena (1989), Sodhi Raman (1989), Arora, R.K. (1992), धारस्कर, आशा मधुकरराव (2002), तुरणकर, हेमलता नरेश (2007), सोनोने, गुणवंत(2008) यांनी भावनिक परिपक्वता व संबंधित घटकावर संशोधन केले भावनिक परिपक्वतेचा सामाजिक-आर्थिक स्तर, बुद्धिमत्ता, शैक्षणिक संपादन, मूल्य, समायोजन, शालेय वातावरण, सतत चिंता, सामाजिक परिपक्वता, लिंग, निराशा, सुरक्षितता व असुरक्षितता, संपादन प्रेरणा, सृजनशीलता, ग्रामीण व शहरी क्षेत्र, अनु.जाती व अनु.जमातीतील विद्यार्थी इत्यादी घटकासंबंधित संशोधन करण्यात आले वरील चलांचा परस्पर संबंध असल्याचे दिसून आले भावनिक परिपक्वता व विविध चलांचा परस्पर संबंध लक्षात घेवून विद्यार्थ्याकरिता शालेय, कौटुंबिक व सामाजिक वातावरणाची निर्मिती करावयास हवी. वरील पूर्व संशोधनाच्या परिशीलन व समीक्षेवरून महत्वपूर्ण तथ्ये समोर आलीत. ज्याचा लाभ शैक्षणिक उन्नतीकरिता शिक्षण क्षेत्रात कार्यरत व्यक्तींना करता येईल.

## संदर्भ ग्रंथ:

गावंडे एकनाथराव, झोंबाडे वर्षा, (2000), "मूल्याधिष्ठित शिक्षण प्रक्रिया आणि उपचार'', अमरावती, निर्मल प्रकाशन.

तुरणकर, हेमलता नरेश, (*2007*) "बुद्धिमत्ता, भावनिक परिपक्वता आणि सामाजिक, आर्थिक दर्जा हे शैक्षणिक संपादनाचे यशदर्शक घटक- एक अध्ययन." पीएच.डी., संत गाडगेबाबा विद्यापीठ, अमरावती (अप्रकाशित).

धारस्कर,आशा मधुकरराव, (*2002*) "विदर्भातील स्त्रियांचा काही मुलभूत व्यक्तिमत्व स्वभाव वैशिष्ट्यावर आणि भावनिक परिपक्वतेवर शिक्षणाचा होणारा परिणाम........ एक अभ्यास." पीएच.डी., संत गाडगेबाबा विद्यापीठ, अमरावती (अप्रकाशित).

भिंताडे वी.रा., (1989), "शैक्षणिक संशोधन पद्धती'', पुणे, नुतन प्रकाशन.

*Copyright © 2017, Scholarly Research Journal for Interdisciplinary Studies*

सोनोने, गुणवंत, (2008), "यवतमाळ जिल्ह्यातील इयत्ता आठवीमध्ये अध्ययन करणाऱ्या अनुसूचित जाती व अनुसूचित जमातीच्या विद्यार्थ्यांच्या भावनिक परिपक्वतेचा तुलनात्मक अभ्यास" एम.फील., संत गाडगेबाबा विद्यापीठ, अमरावती (अप्रकाशित).

*Saksena N.R. Sharma B.K. Mohanthy R.K,* (*2003*),*"Fundamental of Educational Research", Surya Publication,* M*eerut*.

*Buch M.B.,(1979)*, *"Second survey of Research in Education", (1979)*, *Baroda, Published by Society for Educational Research and Development.*

*Buch M.B., (1978-1983), "Third Survey of Research in Education", New Delhi, Published by N.C.E.R.T*.

*Buch M. B., (1982-1988), "Forth survey of Research in Education", Vol. No. 1, New Delhi, Published by N.C.E.R.T*.

*Buch M. B., (1988-1992), "*Fif*th survey of Research in Education", Vol. No. 1, New Delhi, Published by N.C.E.R.T.*

*Buch M. B., (1993-2000)*. *"Six survey of Research in Education', Vol*. No. *1, New Delhi, Published by N.C.E.R.T.*

*Copyright © 2017, Scholarly Research Journal for Interdisciplinary Studies*